**उलटतपास मध्यांतरानंतर पुन्हा शपथेवर सुरु,**

१७.(साक्षीदारास नि.३८, नि.४०, वरील कागदपत्रे दाखविण्यात आली. ) आता मला दाखविण्यात आलेल्या नि. ३८ नि.४० वरील दोन सहया भगवान यांच्या आहेत. (साक्षीदारास नि.४१ वरील कागदपत्रे दाखविण्यात आली. ) आता मला दाखविण्यात आलेल्या नि.४१ वरील चार सहया भगवान यांच्या आहेत. (साक्षीदारास नि.४५ वरील कागदपत्रे दाखविण्यात आली. ) आता मला दाखविण्यात आलेल्या नि.४५ वरील चार सहया भगवान यांच्या आहेत. (साक्षीदारास नि.४६, नि.४७, वरील कागदपत्रे दाखविण्यात आली. ) आता मला दाखविण्यात आलेल्या नि. ४६ नि.४७ वरील दोन सहया भगवान यांच्या आहेत. (साक्षीदारास नि.४७/१ वरील कागदपत्रे दाखविण्यात आली. ) आता मला दाखविण्यात आलेल्या नि. ४७/१ वरील एक सही भगवान यांची आहे. (साक्षीदारास नि.५० वरील कागदपत्रे दाखविण्यात आली. ) आता मला दाखविण्यात आलेल्या नि. ५० वरील तीन सहया भगवान यांच्या आहेत. (साक्षीदारास नि.५२, नि. ५३ वरील कागदपत्रे दाखविण्यात आली. ) आता मला दाखविण्यात आलेल्या नि.५२, नि.५३ वरील दोन सहया भगवान यांच्या आहेत. (साक्षीदारास नि.१० व नि. १५ वरील कागदपत्रे दाखविण्यात आली. ) आता मला दाखविण्यात आलेल्या नि. १० व नि.१५ वरील चार सहया भगवान यांच्या आहेत.

१८. माझ्या माहितीनुसार झालेला करार हा प्रताप जाधव यांनी टाइप केला होता. सदर करार त्यांनी किती तारखेला टाइप केला ते मला आठवत नाही. सदर कागदावर प्रताप जाधव यांनी टाइप करणार म्हणून सही केली. सदर करारास मी इतर कोण कोणते कागदपत्र जोडलेले आहेत ते मला आठवत नाही. सदर कराराच्या जोड पानावर सहया आहेत किंवा कसे हे मी पाहिलेले नाही. सदर करार मी सन २०१७ मध्ये केला होता. माझ्या माहितीनुसार मी सदर करारास दावा मिळकतीचा सातबारा जोडलेला होता. सदरचा सातबारा हा कोणत्या कालावधीचा होता ते मला आठवत नाही. माझ्या बहिणीचे नाव

आक्काताई रामचंद्र पोवार असे आहे. माझ्या बहिणीने माझ्या दावा हक्कसोडपत्र केले होते. सदर हक्कसोडपत्र कोणत्या वर्षी केले होते ते मला आठवत नाही. ज्या वर्षी मी करार केला त्या वर्षीचा दावा मिळकतीचा सातबारा उतारा करारपत्रास जोडायला मला अडचण नव्हती. सदर करारपत्रास उत्तम दत्तू शिंदे व शिवाजी श्रीपती माने यांनी साक्षीदार म्हणून स्वाक्षरी केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर दोन्ही साक्षीदार माझ्या ओळखीचे आहेत. यातील उत्तम दत्तू शिंदे हे माझे नातेवाईक आहेत. शिवाजी श्रीपती माने हे आमच्या गावातील आहेत. सदर दोन्ही साक्षीदारांनी करारपत्रास स्वाक्षरी करतेवेळी त्यांची स्वतःची ओळखपत्रे आणली होती किंवा कसे हे मला आठवत नाही. नोटरी रजिस्टरवर प्रतिवादी यांनी सही केली होती हे दाखविण्याकरिता मी या कामी पुरावा हजर करणार आहे. प्रताप जाधव यांची साक्ष मी घेणार नाही. मी प्रतिवादी यांनी नोटीस सात महिने होताना दिली होती. (साक्षीदारास नि. ३/३ कागद दाखविण्यात आले.) आता मला दाखविण्यात आलेला कागद मी हजर केलेला आहे. सदर कागदावर दोन ठिकाणी भगवान यांची सही आहे. नि. ३/३ मधील मजकूर मी वाचलेला असून तो माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की, खोटे कागदपत्र तयार केले म्हणून भगवान याने माझ्या विरोधात फौजदारी तक्रार दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा करार तयार केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटा करार तयार करून त्याच्या आधारे दावा दाखल करून आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

12/12/25.

दि. १२/१२/२०२५.

**( के. दि. काकतकर )**
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पन्हाळा